**<u>नि.फौ.ख.क्र.९८/२०२४</u>**
**<u>निशाणी क्र. १२</u>**

**<u>दोषारोप</u>**

मी, आर. बी. राऊत, न्यायदंडाधिकारी, प्रथमवर्ग (कोर्ट क्र.२), कर्जत तुमच्याविरुद्ध खालीलप्रमाणे दोषारोप ठेवतो की,

१. **तुषार संजय कदम**
वय–२३ वर्षे, धंदा– मजुरी,
रा. सिध्दार्थ नगर, कर्जत, ता. कर्जत, जि. अहमदनगर

२. **शुभम राजेंद्र अल्हाट**
वय–२३ वर्षे, धंदा–मजुरी,

३. **रोहन आंबादास पवार**
वय–१९ वर्षे, धंदा–मजुरी,
आरोपी क्र. २ व ३ रा. आण्णाभाऊ साठे नगर, कर्जत,
ता. कर्जत, जि. अहमदनगर

पहिले– तुम्ही दि. ३१/०१/२०२४ रोजी दुपारी १२.०० वाजेचे सुमारास महात्मा गांधी शाळेसमोरील पटांगणात तुम्ही आरोपी क्र. १ ते ३ यांनी आपसात संगनमत करुन तुमचे सामाईक हेतूचे पूर्ततेसाठी मागील भांडणाचे कारणावरुन मानवी जीवित किंवा इतरांची व्यक्तीगत सुरक्षीतता धोक्यात येईल इतक्या बेदरकारपणे किंवा हयगयीने फिर्यादीच्या डोक्यात, हातावर, पायावर दगड फेकून मारहाण करुन फिर्यादीच्या किरकोळ दुखापतीस कारणीभुत ठरलात व त्यायोगे तुम्ही भारतीय दंड विधान कलम ३३७ सहकलम ३४ अन्वये शिक्षापात्र असलेला आणि या न्यायालयाच्या दखलगिरीत येणार असा अपराध केला आहे.

दुसरे– उपरोक्त दिवशी,उपरोक्त दिवशी, वेळी व ठिकाणी तुम्ही आरोपी क्र. १ ते ३ यांनी आपसात संगनमत करुन तुमचे सामाईक हेतूचे पूर्ततेसाठी फिर्यादीच्या डोक्यात, हातावर, पायावर दगड फेकून मारहाण करुन इच्छापूर्वक शारीरिक दुखापत केली व त्यायोगे तुम्ही भारतीय दंड संहिता कलम ३२४ सह कलम ३४ प्रमाणे शिक्षेस पात्र असलेला याच न्यायालयाच्या दखलगिरीत येणारा असा अपराध केलेला आहे.

तिसरे– उपरोक्त दिवशी, उपरोक्त दिवशी, वेळी व ठिकाणी तुम्ही आपसात संगनमत करुन तुमचे सामाईक हेतूचे पूर्ततेसाठी आरोपी क्र. १ ते ३ यांनी फिर्यादीला लाथाबुक्यांनी मारहाण करुन इच्छापूर्वक शारीरिक दुखापत केली व त्यायोगे तुम्ही भारतीय दंड संहिता कलम ३२३ सह कलम ३४ प्रमाणे शिक्षेस पात्र असलेला याच न्यायालयाच्या दखलगिरीत येणारा असा अपराध केलेला आहे.

चौथे– उपरोक्त दिवशी, वेळी व ठिकाणी तुम्ही आपसात संगनमत करुन तुमचे सामाईक हेतूचे पूर्ततेसाठी फिर्यादीला जाणीवपूर्वक शिवीगाळ करुन अपमानित केले जेणेकरुन त्यांच्याकडून सार्वजनिक शांततेचा भंग होईल असे कृत्य घडेल व त्यायोगे तुम्ही भारतीय दंड संहिता कलम ५०४ सह कलम ३४ प्रमाणे शिक्षेस पात्र असलेला याच न्यायालयाच्या दखलगिरीत येणारा असा अपराध केलेला आहे.

पाचवे– उपरोक्त दिवशी, वेळी व ठिकाणी तुम्ही आपसात संगनमत करुन तुमचे सामाईक हेतूचे पूर्ततेसाठी फिर्यादीला 'तु आत्ता वाचलास परत तावडीत आल्यावर तुला जिवच मारु' अशी धमकी देवून फौजदारीपात्र धाकदपटशा दाखविला व त्यायोगे तुम्ही भारतीय दंड संहिता कलम ५०६ सह कलम ३४ प्रमाणे शिक्षेस पात्र असलेला याच न्यायालयाच्या दखलगिरीत येणारा असा अपराध केलेला आहे.

आणि मी याद्वारे असा निर्देश देतो की, उक्त दोषारोपाबद्दल तुमची या न्यायालयाद्वारे संपरीक्षा करण्यात येत आहे.

RAMRAO BABURAO RAUT
Digitally signed by RAMRAO BABURAO RAUT
Date: 2025.08.20 17:45:20 +0530

ठिकाण : कर्जत (आर. बी. राऊत)
दिनांक: २०/०८/२०२५ न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग, (कोर्ट क्र.२)
कर्जत.

**<u>प्रमाणपत्र</u>**

दोषारोप मधील मजकुर आरोपी यांना मराठीमध्ये वाचून व समजावून सांगितला. आरोपींचे निवेदन स्वतंत्रपणे नोंदविले आहे.

RAMRAO BABURAO RAUT
Digitally signed by RAMRAO BABURAO RAUT
Date: 2025.08.20 17:45:27 +0530

ठिकाण : कर्जत (आर. बी. राऊत)
दिनांक: २०/०८/२०२५ न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग, (कोर्ट क्र.२)
कर्जत.